**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २२ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **बलिप्रतिपदा तसंच दिवाळी पाडव्याचा सर्वत्र उत्साह; भंडाऱ्यात अनोख्या पद्धतीने गोवर्धन पूजा.**
2. **केंद्र सरकारच्या निकषांमुळे कापसाला योग्य भाव मिळत नसल्याची काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांची टीका.**
3. **माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांची नागपूरच्या आकाशवाणी केंद्राला भेट; विविध विभागांच्या कामकाजाचा घेतला आढावा.**
4. **ऑलिंपिक स्पर्धेत दोन वेळा पदक जिंकणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा याला भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नल म्हणून पदोन्नती.**

---------------------------------------------------------

**बलिप्रतिपदा**

दीपावलीच्या प्रकाश पर्वातला बलिप्रतिपदेचा सण आज सर्वत्र साजरा होत आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या दिवाळी पाडव्याच्या दिवशी नवीन खरेदी किंवा उपक्रमांचा प्रारंभ केला जातो. बलिप्रतिपदे निमित्त शेअर बाजार आज बंद आहेत. आजच्या दिवशी गोवर्धन पूजन केलं जातं.

---------------------------------------------------------

**गोवर्धन पूजा**

भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील जांभोरा-पालोरा गावात गोवर्धन पूजेची 150 वर्षांपासून चालत आलेली अनोखी परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या परंपरेनुसार, ज्या घरात गोधन असेल ते गोधन, कुटुंब प्रमुखाला ओलांडून पुढे जातं अशी प्रथा आहे. पूजेच्या आदल्या दिवशी ‘ढाल जागरण’ कार्यक्रमात गुराखी गाई-बैलांच्या मालकांच्या घरी जाऊन बोजारा मागतात आणि घरातील स्त्रिया ढालीचे पूजन करतात. गावातील पशुधनावर रोगराई येऊ नये म्हणून या दिवशी ग्रामदेवतेला साकडं घातलं जातं.

---------------------------------------------------------

**काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील, आदिवासी पाड्यांवर दरवर्षी प्रमाणे यंदाही आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली. मागील २६ वर्षांपासून ते आपल्या घरी दिवाळी साजरी न करता, भिंगारा, गोमाल, चाळीसटपरी, उमापूर अशा दुर्गम आणि डोंगराळ भागातील आदिवासींमध्ये जाऊन, कपडे आणि मिठाई वाटप करतात. या अनोख्या दिवाळी बद्दल सांगताना ते म्हणाले....

***(होल्ड बाईट- हर्षवर्धन सपकाळ १७ सेकंद)***

पाड्यावरच्या दिवाळीत, सपकाळ यांच्यासमवेत त्यांचं कुटुंबीय देखील उपस्थित होतं.

-----------------------------------------------------------

**विजय वडेट्टीवार**

राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत असून केंद्र सरकारच्या निकषांमुळे, कापसाला योग्य भाव मिळत नाही अशी टीका, काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. नागपुरात पत्रकारांशी बोलताना, त्यांनी महायुती सरकारवर, टीका करताना सत्ताधारी आमदारांना, पाच कोटी रुपयांचा निधी देण्यात आल्याचा उल्लेख केला. शेतकऱ्यांसाठी पैसा नाही कां? असा सवाल देखील, त्यांनी उपस्थित केला. राज्यातील आदिवासी आणि मागासवर्गीय विभागांचा निधी वळवला जात असल्याकडेही, त्यांनी लक्ष वेधलं. तसंच मनसे, महाविकास आघाडीत येणार कां, याबाबत निर्णय, वरिष्ठ पातळीवर होईल असंही, वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं.

-----------------------------------------------------------

**विकास ठाकरे**

नागपूर शहरातील पडलेला कचरा, तुंबलेली गटारे, पाणी पुरवठा, अतिक्रमणावरील कारवाई, महापालिकेतील भ्रष्टाचार तसंच नारा इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय उद्यानासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न नागपूर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांकडून करण्यात आल्याचा आरोप नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि आमदार विकास ठाकरे यांनी केला. ते म्हणाले-

***(होल्ड बाईट - आमदार विकास ठाकरे २४ सेकंद)***

संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ बडतर्फ करून त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करावेत तसंच या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालावं अशी मागणी त्यांनी आज, नागपूरात पत्रकार परिषदेत केली.

-----------------------------------------------------------

**आढावा**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज नागपूरच्या आकाशवाणी केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी नागपूरच्या आकाशवाणी, दूरदर्शन, पत्र सूचना कार्यालय आणि केंद्रीय संचार ब्युरोच्या कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेतला. आकाशवाणीच्या माध्यमातून जाहिरात संकलनाच्या कार्याला गती देण्याचे निर्देश त्यांनी सबंधित अधिकाऱ्यांना दिले तसंच निवृत्ती वेतन संदर्भात त्रुटींच निराकरण करण्याचं आश्वासन दिलं. याप्रसंगी आकाशवाणी नागपूरच्या अभियांत्रिकी, कार्यक्रम आणि वृत्त विभागाचे अधिकारी तसंच पत्र सूचना कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते. दरम्यान आज संजय जाजू यांनी, माहिती प्रसारण मंत्रालयाच्या अधिन असलेल्या अमरावती इथल्या आय.आय.एम.सी. अर्थात भारतीय जनसंवाद संस्थेच्या बांधकामाचा देखील आढावा घेतला. याप्रसंगी अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्ता सौम्या शर्मा, आय.आय.एम.सी.अमरावतीचे क्षेत्रीय संचालक डॉ.राजेश कुशवाह उपस्थित होते.

-----------------------------------------------------------

**स्वदेशी वस्तूंचा स्टॉल**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वदेशी वस्तू वापरण्याचं आवाहन केलं आहे. त्याला प्रतिसाद देत बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहरातील ९०% दिव्यांग असलेले रवींद्र इंगळे यांनी आत्मनिर्भरतेचं उदाहरण घालून दिलं आहे. विदेशी वस्तूंची खरेदी टाळत त्यांनी स्वतः मातीच्या पणत्या, वाती तसंच पूजन साहित्य तयार करून, स्वदेशी वस्तूंचा स्टॉल सुरू केला आहे. 'आत्मनिर्भर भारत'चा नारा देत, त्यांनी जनतेला भारतीय वस्तू खरेदीचं आवाहन केलं आहे.

***(होल्ड बाईट - १४ सेकंद)***

विशेष म्हणजे या विक्रीतून मिळणाऱ्या नफ्याचा काही भाग ते मुख्यमंत्री सहायता निधीस दान करणार आहेत.

-----------------------------------------------------------

**किरकोळ विक्री-GST**

जी.एस.टी.दरांत झालेल्या कपातीमुळे, बाजारपेठेत तेजी दिसत आहे. ऐकुया याबाबत आमच्या प्रतिनिधींकडून -

***(व्हॉइस कास्ट -नम्रता फलके)***

***भारतातील किरकोळ विक्री क्षेत्रानं यावर्षी नवरात्र ते दिवाळी दरम्यान सणासुदीच्या हंगामातील सर्वाधिक विक्री नोंदवली. यामध्ये अभूतपूर्व ५ लाख ४० हजार कोटी रुपयांच्या वस्तू आणि ६५ हजार कोटी रुपयांच्या सेवांची उलाढाल झाली. अखिल भारतीय व्यापारी महासंघानं केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणात, याच कालावधीत एकंदर उलाढाल गेल्या वर्षीच्या तुलनेत, २५ टक्क्यांनी वाढल्याचं दिसून आलं आहे. प्रामुख्यानं GST दरांमध्ये घट झाल्यामुळं, ही वाढ झाली आहे. मिठाई, गृहसजावट, पादत्राणं, तयार कपडे, ग्राहकोपयोगी आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किंमती, सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यात आल्या आहेत, आणि खरेदीचा वेग वाढला आहे. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)***

---------------------------------------------------------

**डॉ.एकनाथ चिटणीस निधन**

ज्येष्ठ अंतराळ शास्त्रज्ञ, पद्मभूषण डॉ.एकनाथ चिटणीस यांचं आज सकाळी पुण्यात निधन झालं. ते १०० वर्षांचे होते. इस्रोच्या जडण घडणीत त्यांनी मोलाचं योगदान दिलं होतं. डॉ.होमी भाभा यांच्यासह, भारतीय अवकाश कार्यक्रमाची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या, शास्त्रज्ञांमध्ये त्यांचा समावेश होतो. देशातला इन्सॅट हा पहिला दूरसंचार उपग्रह बनवण्यात त्यांनी, मोलाची भूमिका बजावली.

---------------------------------------------------------

**नीरज चोप्रा**

ऑलिंपिक स्पर्धेत दोन वेळा पदक जिंकणारा भाला फेकपटू नीरज चोप्रा याला भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नल म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि लष्कर प्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्या उपस्थितीत आज, नवी दिल्ली इथे हा समारंभ झाला. त्यांनी नीरज चोप्रा याच्या लष्करी गणवेशावर, नवीन पदाचं चिन्ह लावून, त्याला अधिकृतपणे बढती दिली. ऑगस्ट २०१६ मध्ये चोप्रा याला भारतीय सैन्यात नायब सुभेदार पदावर ज्युनियर कमिशन्ड ऑफिसर म्हणून रुजू करण्यात आलं होतं. त्याला मिळालेल्या अर्जुन पुरस्कार आणि खेलरत्न पुरस्कारानंतर, २०२१ मध्ये सुभेदार पदावरही बढती

मिळाली होती. २०२२ मध्ये भारतीय सैन्यातर्फे परम विशिष्ट सेवा पदक देण्यात आलं तसंच सुभेदार मेजर पदावरही बढती देण्यात आली होती.

---------------------------------------------------------

**एकदिवसीय क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना उद्या ऑस्ट्रेलियातील अॅडलेड इथल्या मैदानावर होणार आहे. पर्थमध्ये झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा सात गडी राखून पराभव केला होता. या मालिकेत भारतीय संघ १-० असा पिछाडीवर आहे. उद्याचा सामना जिंकून मालिकेत बरोबरी करण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

---------------------------------------------------------

**महिला क्रिकेट**

महिलांच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, भारताचा सामना उद्या न्यूझिलंडच्या संघासोबत होणार आहे. स्पर्धेतील पहिले दोन्ही सामने जिंकून, भारतीय महिला संघाने चांगली सुरुवात केली होती. परंतु त्यानंतरचे तीनही सामने गमावल्यामुळे, भारतीय संघ अडचणीत आला आहे. त्यामुळे पुढचे दोन्ही सामने त्यांना जिंकावेच लागतील.

---------------------------------------------------------

**हवामान**

मराठवाडा आणि विदर्भाचा काही भाग वगळता राज्याच्या बहुतांश भागासाठी हवामान विभागानं आज आणि उद्यासाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. या काळात राज्यात अनेक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

---------------------------------------------------------